# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांकः30.08.2026** **वारःरविवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज उझबेकिस्तानच्या दौऱ्यावर- विविध क्षेत्रांतील द्विपक्षीय सहकार्य वाढवण्यावर होणार चर्चा
2. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' कार्यक्रमाचा आज 137 वा भाग
3. आर्थिक गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी भारतीय न्यायव्यवस्थेचा पुढाकार-सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांचं प्रतिपादन
4. नेपाळ पुरात मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या 675 वर मदत आणि बचाव कार्याला वेग आणि
5. टी-20 आशिया चषक महिला क्रिकेटमध्ये, आज भारत आणि थायलंड यांच्यात लढत

**पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज उझबेकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष शौकत मिर्झियोयेव यांच्याशी ताश्कंद इथं द्विपक्षीय चर्चा करणार आहेत. या बैठकीत दोन्ही नेते व्यापार, गुंतवणूक, संरक्षण, डिजिटल कनेक्टिव्हिटी, ऊर्जा, शिक्षण आदी विविध क्षेत्रांतील सहकार्याचा आढावा घेणार आहेत. तत्पूर्वी पंतप्रधान आज उझबेकिस्तानच्या योग फेडरेशननं आयोजित केलेल्या योग कार्यक्रमात सहभागी होतील. उभय देशांत संरक्षण क्षेत्रातील सहकार्य सातत्यानं वाढत आहे. यासोबतच दुर्मिळ खनिजं, सोनं तसंच इतर उपयुक्त खनिजांच्या क्षेत्रात सहकार्य वाढवण्यावरही यावेळी चर्चा होण्याची शक्यता आहे. औषधनिर्माण, कृषी, कौशल्य विकास आणि नवीन संपर्क मार्ग विकसित करण्याच्या संधी यावरही चर्चेची शक्यता आहे. गेल्या दहा वर्षांत भारत आणि उझबेकिस्तानमधील व्यापारात सुमारे 300 टक्क्यांनी वाढ झाली आहे. सध्या सुमारे एक अब्ज डॉलर असलेला द्विपक्षीय व्यापार आगामी काळात दुप्पट करण्याचं दोन्ही देशांचं उद्दिष्ट आहे. या भेटीमुळे उभय देशांमधील संबंधांना आणखी बळकटी मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं काल संध्याकाळी ताश्कंद विमानतळावर उझबेकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष शौकत मिर्झियोयेव्ह यांनी स्वागत केलं. त्यानंतर, भारतीय आणि उझबेक समुदायानं त्यांचं पारंपरिक पद्धतीनं उत्साहात स्वागत केलं. यावेळी भारतीय कलाकारांनी कथक नृत्याचं सादरीकरण केलं, तर उझबेक कलाकारांनी भारतीय गाण्यांवर नृत्य सादर केलं.

**मन की बात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आकाशवाणीवरील 'मन की बात' या कार्यक्रमाद्वारे आज सकाळी 11 वाजता देश-विदेशातील जनतेशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा हा 137 वा भाग असेल. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनचं संपूर्ण नेटवर्क, न्यूजऑनएआयआर वेबसाइट आणि मोबाइल ॲपवर प्रसारित केला जाईल.याशिवाय एआयआर न्यूज, डीडी न्यूज, पंतप्रधान कार्यालय तसंच माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या यूट्यूब चॅनेलवरही या कार्यक्रमाचं थेट प्रक्षेपण केलं जाईल. तर हिंदीतील प्रक्षेपणांनंतर लगेचच आकाशवाणीद्वारे हा कार्यक्रम प्रादेशिक भाषांमध्येही प्रसारित केला जाईल.

**सरन्यायाधीश**

'डिजिटल अटक' घोटाळ्यासारख्या नव्या फसवणूक प्रकारांना आळा घालण्याकरता भारतीय न्यायव्यवस्था सक्रियपणे पुढाकार घेलयचं सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी म्हटलं आहे. लंडन इथे आयोजित 43 व्या आंतरराष्ट्रीय आर्थिक गुन्हे परिषदेतील आपल्या समारोपीय भाषणात बोलतांना सर्वोच्च न्यायालयाने 'डिजिटल अटक' घोटाळ्याची स्वतःहून दखल घेतल्याचं त्यांनी सांगितलं. आर्थिक गुन्ह्यांबाबत भारताच्या आधुनिक प्रतिसादाकडे पाहताना, तो केवळ एक कायदा नसून अनेक दशकांपासून जाणीवपूर्वक उभारलेली एक बहुस्तरीय रचना असल्याचं ते म्हणाले.

**नेपाळ**

नेपाळमध्ये आलेल्या पुरामुळं मृत्यूमुखी पडलेल्यांची संख्या 675 वर पोहोचली आहे. तर सुमारे 2400 लोक अजूनही बेपत्ता आहेत. आत्तापर्यंत 4400 हून अधिक लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात यश आलं आहे. नेपाळ सरकार पूरग्रस्त नागरिकांच्या पाठीशी

खंबीरपणे उभं असून प्रत्येक नागरिकाचा जीव वाचवणं ही सरकारची सर्वोच्च प्राथमिकता आहे,असं नेपाळचे पंतप्रधान बालेन्द्र शाह यांनी म्हटलं आहे. दरम्यान, खराब हवामान आणि बाधित झालेल्या पायाभूत सुविधांमुळं सर्वाधिक फटका बसलेल्या काही भागांपर्यंत पोहोचणं कठीण होत असल्याचं आपत्कालीन पथकांनी सांगितलं आहे. नेपाळच्या हवामान विभागानं पूरग्रस्त भागांत आणखी पाऊस आणि वादळाचा इशारा दिला आहे, ज्यामुळे सुरू असलेल्या बचाव आणि मदत कार्यात अडथळा निर्माण होण्याची शक्यता आहे.

**<u>नेपाळ-भारत</u>**

नेपाळमध्ये अडकलेल्या 108 भारतीय नागरिकांची सुटका करण्यात आली असल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं सांगितलं आहे.तसंच चीनमधून अद्याप न निघालेले 900 भारतीय नागरिक सुरक्षित आहेत आणि बीजिंगमधील भारतीय दूतावास त्यांच्याशी संपर्कात आहे,असं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी समाजमाध्यमावरील संदेशात सांगितलं आहे. तर काठमांडूला 11 टन मदत सामग्री घेऊन जाणारं चौथे विमान काल रवाना करण्यात आल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी सांगितलं आहे.

**<u>नेपाळ-मदत</u>**

नेपाळमधील पूरग्रस्त भागांत अडकलेल्या व्यक्तींचा शोध आणि बचाव कार्य सुलभ करण्यासाठी, भारताच्या 11 सदस्यांच्या तांत्रिक पथकानं काल तिथल्या जलविद्युत प्रकल्पांच्या बोगद्यांची प्रत्यक्ष पाहणी केली. चिलीमे आणि लांगटांग भागांची हवाई पाहणी केल्यानंतर, या भारतीय पथकानं बोगद्याच्या परिसरात आवश्यक बचाव कार्य सुरू केलं. नेपाळ लष्कर, सशस्त्र पोलीस दल आणि नेपाळ पोलीस यांच्या 82 सदस्यांचे संयुक्त सुरक्षा पथकदेखील काल रात्रीपासून ढिगारा हटवण्याचं आणि बोगद्यात अडकलेल्या लोकांपर्यंत पोहोचण्याचं काम करत आहे. नेपाळ लष्कराने दिलेल्या माहितीनुसार, नेपाळी सुरक्षा दलांनी आतापर्यंत देशातील विविध जलविद्युत प्रकल्पांच्या बोगद्यांमधून 191 कामगारांची सुटका केली आहे. मात्र बोगद्यांमध्ये आणखी लोक अडकल्याच्या शक्यतेमुळं नेपाळी प्रशासनानं भारताकडं मदत मागितली.

**<u>उपराष्ट्रपती</u>**

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन दोन दिवसांच्या दौऱ्यावर आज केरळमला जात आहेत. ते अलाप्पुझा इथं 'केरळ कौमुदी' या दैनिकाच्या सुवर्णमहोत्सवी सोहळ्याला उपस्थित राहतील. त्यानंतर, उपराष्ट्रपती पथानामथिट्टा जिल्ह्यात 'अरनमुला बोट रेस'चं उद्घाटन करतील. तर संध्याकाळी तिरुवनंतपुरम इथं आयोजित 'ओणम पर्यटन सप्ताह' उत्सवाच्या सांगता सोहळ्यातही सहभागी होतील.

**<u>एमसीए</u>**

मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या परिसरातील 5 उपहारगृहांचे अन्न परवाने निलंबित केल्याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयानं महाराष्ट्र अन्न आणि औषध प्रशासन अर्थात एफडीए ला खडसावलं आहे आणि त्यांचं परवाना निलंबन रद्द करून ही 5 उपहारगृहं पुन्हा सुरू करण्यास परवानगी दिली आहे. प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रविंद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. न्यायालयाने एफडीएच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. न्यायालयाच्या निर्देशांकडे वारंवार दुर्लक्ष करून विभागाने व्यावहारिक दृष्टिकोनाऐवजी संकुचित भूमिका घेतल्याचं खंडपीठानं नमूद केलं. एफडीएच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त करताना न्यायालयाने अधिकाऱ्यांना कठोर इशारा दिला.

**<u>SIR</u>**

महाराष्ट्र राज्यातील मतदार याद्यांच्या दुरूस्तीसाठी राबवण्यात आलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेत पात्र मतदारांची प्रारुप मतदार यादी उद्या प्रसिद्ध केली जाणार आहे. यानंतर लगेचच म्हणजे उद्यापासून ते येत्या 30 सप्टेंबरपर्यंत मतदारांकडून दावे आणि हरकती स्वीकारण्यात येणार असून त्यांचा निपटारा करण्याची प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. 4 नोव्हेंबर ला अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार असल्याचं राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी सांगितलं. नवीन निकषांनुसार राज्यात आता किमान 300 आणि कमाल 13 शे मतदारांसाठी एक मतदान केंद्र निश्चित करण्यात आलं आहे.

**<u>रास्वसं- मोहन भागवत</u>**

हिंदुत्व हे प्रत्येक मानवाच्या प्रतिष्ठेचा आदर करतं आणि एकाच सत्यापर्यंत पोहोचण्याचे विविध मार्ग स्वीकारतं असं मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी व्यकात व्यक्त केलं आहे. ते काल अमेरिकेत न्यूयॉर्कमध्ये आयोजित एक जग, एक मानवता या विषयावरील आयोजित धर्मगुरूंच्या परिषदेत बोलत होते. परकीय आक्रमणं आणि आपल्या सांस्कृतिक वारशातील अनेक घटकांचं नुकसान होऊनही भारताची सह-अस्तित्वाची परंपरा टिकून राहिली आहे, असं सांगत धर्मगुरूंनी समाज प्रबोधनाचं कार्य चालू

ठेवलं पाहिजे तसंच हे कार्य कठीण असलं तरी सध्याच्या जागतिक परिस्थितीत ते आवश्यक आहे, असंही मोहन भागवत यावेळी म्हणाले.

## राजनाथ सिंह

संरक्षणमंत्री राजनाथ सिंह आज लखनौमध्ये एका उद्योग परिषदेला संबोधित करणार आहेत. प्रधानमंत्री सेतू योजनेअंतर्गत आयोजित या परिषदेत कौशल्य विकास, उद्योजकता आणि व्यावसायिक शिक्षणावर चर्चा होणार आहे.त्यांच्या तीन दिवसांच्या लखनौ दौऱ्याचा आज शेवटचा दिवस आहे. त्यानंतर मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या उपस्थितीत लखनौ कॅन्टोन्मेंट परिसरातील 101 कोटी रुपयांच्या 12 विकास प्रकल्पांची पायाभरणी राजनाथसिंह करतील. दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी काल लखनौमध्ये फ्रेग्रन्स पार्कचं उद्घाटन सिंह यांनी केलं. तसंच लाला लजपत राय आणि शहीद भगतसिंग यांच्या पुतळ्यांचं अनावरण केलं आणि कोट्यावधी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी केली. बाबासाहेब भीमराव आंबेडकर विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभाला त्यांनी संबोधित केलं आणि गोमतीनगरमधील ज्येष्ठ नागरिक निवासाचं उद्घाटनही राजनाथसिंह यांनी केलं.

## महिला-क्रिकेट

महिला क्रिकेटमध्ये, आज भारत आणि थायलंड दरम्यानचा टी-20 आशिया चषक सामना दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर होणार आहे. हा सामना भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री साडेआठ वाजता सुरू होणार आहे. हरमनप्रीत कौर भारतीय संघाचं नेतृत्व करेल, तर स्मृती मानधना उपकर्णधार असेल. दुखापतग्रस्त जेमिमाह रॉड्रिग्जच्या जागी प्रतिका रावलचा संघात समावेश करण्यात आला आहे. थायलंडनं 28 तारखेला चीनवर विजय मिळवून स्पर्धेची सुरुवात केली आहे.

## हवामान

हवामान विभागानं आज ओडिशामध्ये मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, छत्तीसगड आणि पश्चिम बंगालमध्ये आज मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. तसंच, बिहार, उत्तराखंड, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, झारखंड, नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा, सिक्कीम आणि विदर्भातही आज मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. याव्यतिरिक्त, जम्मू-काश्मीर, लडाख, अंदमान आणि निकोबार बेटे, तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि कराईकल इथं आज विजांच्या कडकडाटासह वादळ आणि सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल.

# नमस्कार.